जनसंपर्क कक्ष
21 APR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ४७ हजार विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेसाठी ४७ हजार २८२ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बीकॉम, बीए, बीएस्सी, एमबीए, एमए बीएड, एमएसडब्ल्यू, एमसीए, पीजी डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, बॅचलर ऑफ लॉ (तीन व पाच वर्ष) आदी विविध १५९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७७ केंद्रांवर झाल्या. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.


2 1 APR 2026
सकाळ

# रंग कुंचल्याचे स्पर्धेत शिक्षकांचाही सहभाग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातर्फे जागतिक कला दिन आणि जागतिक वारसा दिन संयुक्तपणे साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'रंग कुंचल्याचे' ही स्पॉट पेंटिंग स्पर्धा घेण्यात आली. त्यात हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षक स्पर्धक म्हणून सहभागी झाले. हिंदी अधिविभागातील शिक्षक विद्यार्थ्यांसह भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी, संशोधकांनी सहभाग नोंदविला. वि. स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ झालेल्या स्पर्धेचे संयोजन डॉ. प्रकाश निकम, गीता दोडमणी, जयसिंग कांबळे आदींनी केले.

2 1 APR 2026

जनप्रवास



# जागतिक कला, वारसा दिनानिमित्त विद्यापीठात 'रंग कुंचल्याचे' स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत नुकताच जागतिक कला दिन (१५ एप्रिल) आणि जागतिक वारसा दिन (१८ एप्रिल) असा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला.

विद्यापीठात या निमित्ताने 'रंग कुंचल्याचे' ही स्पॉट पेंटींग स्पर्धा शनिवारी (दि १८) घेण्यात आली. विशेष म्हणजे या स्पर्धेत हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षकही स्पर्धक म्हणून सहभागी झाले.

स्पर्धेत हिंदी अधिविभागातील शिक्षक विद्यार्थ्यांसह भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनीही सहभाग घेतला. सर्वांनीच स्वतःला रंगांच्या दुनियेत हरवून चित्रकलेचा आनंद घेतला. वि.स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ पार पडलेल्या या स्पर्धेत डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे, प्रतीक्षा ठुंबरे आदींनी सहभाग घेतला तसेच संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
21 APR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले, महर्षी शिंदेंच्या अनुबंधाविषयी शिवाजी विद्यापीठात उद्या चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने गुरुवारी (दि. २३) शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या वतीने विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदेः अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.

महात्मा फुले व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची आधुनिक कालखंडातील कृतिशील समाजसुधारक म्हणून ओळख आहे. महात्मा फुले यांनी एकोणिसाव्या शतकात सामाजिक सुधारणेचा व समतेचा पाया घातला. तसेच विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतीय स्तरावर



केलेले कार्य अनन्यसाधारण आहे. महात्मा फुले व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य आणि विचारविश्वात अनेक अनुबंध आहेत. याच अनुबंधांचा अन्वयार्थ लावण्यासाठी हे चर्चासत्र आयोजित केले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस करणार आहेत. प्रा. सुशील धसकटे बीजभाषण करणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी असतील. दुसऱ्या सत्रात 'महात्मा फुले, महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ' या विषयावर मांडणी होईल. या सत्रामध्ये 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांचे स्त्रीविषयक कार्य व दृष्टिकोन'वर उद्धव धुमाळे (पुणे), तर 'महर्षी शिंदे यांच्या वाङ्मयातील फुले अनुबंध' वर प्रा. प्रकाश पवार मांडणी करतील. 'महर्षी शिंदे यांचे कार्यः महात्मा फुले कार्याचा विस्तार' या विषयावर रमेश चव्हाण (पुणे) बोलतील. द्वितीय सत्र 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा सामाजिक-सांस्कृतिक अनुबंध' या विषयावर असेल. यामध्ये डॉ. भक्ती महाजन (गोवा), डॉ. सुरेश शिखरे (कोल्हापूर), मोहसीन पठाण (कोल्हापूर) मांडणी करतील. प्रा. नंदकुमार मोरे सत्राध्यक्ष असतील. समारोप सत्रात प्राचार्य डॉ. शंकरराव कदम मार्गदर्शन करणार असून अध्यक्षस्थानी प्रा. प्रकाश पवार असतील. चर्चासत्रात प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व अभ्यासक यांना सहभागी होण्याचे आवाहन डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

21 APR 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठात 'रंग कुंचल्याचे' स्पॉट पेंटिंग स्पर्धेत हिंदी विभागप्रमुखांसह शिक्षकांनी भाग घेतला.

# विद्यापीठात रंगल्या 'रंग कुंचल्याचे' स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामार्फत जागतिक कला दिन आणि जागतिक वारसा दिनाच्या संयुक्त उपक्रमांतर्गत विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ 'रंग कुंचल्याचे' ही स्पॉट पेंटिंग स्पर्धा रंगली. या स्पर्धेत हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षकही स्पर्धक म्हणून सहभागी झाले. स्पर्धेत भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी आणि संशोधकांनीही भाग घेतला. सर्वांनीच स्वतःला रंगांच्या दुनियेत हरवून चित्रकलेचा आनंद घेतला. या स्पर्धेत डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे, प्रतीक्षा ठुंबरे आदींनी संयोजन केले.

21 APR 2026

पुण्यनगरी

# विद्यापीठात 'रंग कुंचल्याचे' स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत नुकताच जागतिक कला दिन (१५ एप्रिल) आणि जागतिक वारसा दिन (१८ एप्रिल) असा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'रंग कुंचल्याचे' ही स्पॉट पेंटिंग स्पर्धा शनिवार, दि. १८ रोजी घेण्यात आली. विशेष म्हणजे या स्पर्धेत हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षकही स्पर्धक म्हणून सहभागी झाले. स्पर्धेत हिंदी अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थ्यांसह भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनीही सहभाग घेतला. सर्वांनीच स्वतःला रंगांच्या दुनियेत हरवून चित्रकलेचा आनंद घेतला. वि. स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ पार पडलेल्या या स्पर्धेत डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे, प्रतीक्षा ठुंबरे आदींनी सहभाग घेतला तसेच संयोजन केले.

2 1 APR 2026

पुण्यनगरी

# फुले, शिंदे यांच्याविषयी विद्यापीठात चर्चासत्र

**कोल्हापूर :** महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने गुरुवार, दि. २३ रोजी शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या वतीने विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे.दोन्हीही महामानवांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकण्यासाठी आयोजित या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस करणार आहेत. प्रा. सुशील धसकटे बीजभाषण करणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी असतील. दुसऱ्या सत्रात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ' या विषयावर मांडणी होईल.

2 1 APR 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या 'सैफ केंद्रा'चा केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव

प्रतिनिधी, कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान–तंत्रज्ञान विभागाने (डीएसटी) शिवाजी विद्यापीठाच्या कॉमन फॅसिलिटी सेंटर–सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सीएफसी सैफ) या विभागाच्या दर्जेदार कामगिरीची दखल घेतली आहे. विद्यापीठाच्या या केंद्रात उपलब्ध असलेली अत्याधुनिक उपकरणे आणि सुविधांची माहिती देणारी लघुचित्रफीत केंद्रीय विभागाने त्यांच्या समाजमाध्यमांच्या सर्व मंचावरून प्रदर्शित केली आहे. अशा प्रकारे केंद्रीय मंत्रालयाकडून गौरव होण्याचा बहुमान मिळविणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने आपल्या एक्स, लिंक्डइन आणि फेसबुक या समाजमाध्यमांच्या मंचावरून सीएफसी–सैफ केंद्राची माहिती देणारी तीन मिनिटांची लघुचित्रफीत प्रदर्शित केली आहे. यासोबत लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, केंद्रीय विज्ञान–तंत्रज्ञान मंत्रालयाचे पाठबळ लाभलेल्या शिवाजी विद्यापीठ येथील सोफिस्टिकेटेड ॲनालिटीकल इन्स्ट्रुमेंट फॅसिलिटीज (सैफ) हे केंद्र संपूर्ण भारतातील संशोधक, शैक्षणिक संस्था, उद्योगांना अत्याधुनिक विश्लेषणात्मक आणि वैशिष्ट्यपूर्ण सेवा पुरवत आहे. मंत्रालयाच्या सैफ कार्यक्रमांतर्गत २०१४ मध्ये स्थापन झालेले हे केंद्र, अतिप्रगत उपकरणांच्या सहाय्याने अचूक विश्लेषण आणि नाविन्यपूर्णतेला चालना देऊन वैज्ञानिक संशोधनाला यशस्वीपणे बळकटी देत असल्याचे स्पष्ट केले आहे.



विद्यापीठाच्या सीएफसी–सैफ केंद्रात उपलब्ध अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणे.

या पोस्टमध्ये मंत्रालयाने खात्याचे केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह, सचिव अभय करंदीकर यांच्यासह केंद्रीय जैवतंत्रज्ञान मंत्रालय, भूविज्ञान मंत्रालय, सीएसआयआर–इंडिया यांना टॅग केले आहे.

सैफ केंद्राचे संचालक डॉ. ज्योतीप्रकाश यादव म्हणाले, विद्यापीठाच्या सीएफसी–सैफ केंद्रामध्ये एकूण सोळा अतिउच्च दर्जाची अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणे आहेत. त्यावर विविध विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योगांमधील संशोधकही संशोधनाचे नमुने तपासणीसाठी पाठवतात. २०२०–२१ मध्ये २४०० नमुने तपासणीसाठी आले होते. यातून दोन लाख ४४ हजार रुपये उत्पन्न मिळाले होते.

## दरवर्षी १२०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरण हाताळणी प्रशिक्षण

**केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यशाळा, विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग, प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी साधारणतः १२०० विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरण हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येते. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळेच हा सन्मान केंद्राला लाभला आहे, अशी भावना डॉ. ज्योतीप्रकाश यादव यांनी व्यक्त केली.**

21 APR 2026

पुढारी

# महात्मा फुले, महर्षी शिंदे यांच्या अनुबंधाविषयी शिवाजी विद्यापीठात गुरुवारी चर्चासत्र

**कोल्हापूर :** महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने गुरुवारी (दि. २३) शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन यांच्या वतीने विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात महात्मा फुले आणि महर्षी शिंदे: अनुबंधांचा अन्वयार्थ, या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस करणार आहेत. प्रा. सुशील धसकटे बीजभाषण करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी असतील. दुसऱ्या सत्रात महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ या विषयावर मांडणी होईल. महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांचे स्त्रीविषयक कार्य व दृष्टिकोन या विषयावर उद्धव धुमाळे, महर्षी शिंदे यांच्या वाङ्मयातील फुले अनुबंध, या विषयावर प्रा. प्रकाश पवार हे मांडणी करतील. महर्षी शिंदे यांचे कार्य : महात्मा फुले कार्याचा विस्तार, या विषयावर रमेश चव्हाण बोलतील. द्वितीय सत्र 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा सामाजिक-सांस्कृतिक अनुबंध' या विषयावर असेल. समारोप सत्रात प्राचार्य डॉ. शंकरराव कदम मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रात सहभागी होण्याचे आवाहन मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.